**केंद्र शासनाकडून "राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य" या योजनेसाठी Single Nodal Agency (SNA) चे स्वतंत्र खाते व अंमलबजावणी यंत्रणांचे शून्य शिल्लक उपखाती उघडणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

## वित्त विभाग

**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२६/प्र.क्र.३७/अर्थबळ**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक : १४/५/२०२६.

**वाचा** – १) भारत सरकार, वित्त मंत्रालय यांचे पत्र क्रमांक क्र. F.No. ४४(१)/PF-S/२०२६-२७/CAPEX, दि.२७/०३/२०२६.
२) भारत सरकार, वित्त मंत्रालय यांचे पत्र क्रमांक क्र. F.No. ४४(१)/PF-S/२०२६-२७/CAPEX, दि.१७/०४/२०२६.
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५, दि.१३/०३/२०२०.
४) वित्त विभाग] शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-४, दि.०१/०७/२०२१.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाच्या " भांडवली गुंतवणुकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य २०२६-२७" या योजनेंतर्गत राज्य सरकारांना भांडवली गुंतवणूक प्रकल्पांसाठी ५० वर्षांच्या बिनव्याजी कर्जाच्या स्वरूपात आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येणार आहे. यासंदर्भात केंद्र शासनाच्या व्यय विभागाने उपरोक्त संदर्भ (१) येथील दिनांक २७.०३.२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर योजनेची मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. या योजनेंतर्गत राज्यांना प्रदान करण्यात येणारा निधी राज्याच्या दीर्घकालीन फायद्यासाठी भांडवली प्रकल्पांसाठी वापरायचा आहे. राज्य शासनाने सादर केलेल्या प्रकल्प प्रस्तावांची केंद्र शासनाकडून छाननी करण्यात येणार असून त्याअंती मंजुर प्रकल्पांना कर्ज निधी प्राप्त होणार आहे.

२. केंद्र शासनाच्या दिनांक २७.०३.२०२६ च्या मार्गदर्शक सूचनानुसार सन २०२६-२७ मध्ये राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजना (SASCI) मध्ये देण्यात येणारा सर्व निधी SNA मार्फत दयावयाचा आहे .

३. केंद्र शासनाच्या सूचनानुसार सर्व भागांसाठी मिळून एकच SNA (Single Nodal Agency) नेमावयाचे आहे. SNA ने Scheduled Commercial Bank मध्ये खाते उघडावयाचे आहे .यापूर्वी वित्त विभागाच्या संदर्भीय क्र.३ येथील दि.१३.३.२०२० च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार राज्य शासनाची सर्व बँक खाती राष्ट्रीयकृत बँकेत उघडण्याच्या निर्देशास अनुसरुन, SNA च्या अधिपत्याखालील अंमलबजावणी यंत्रणांनी Scheduled Commercial Bank बँकेत Zero Balance Subsidiary Account (ZBSA) उघडावयाचे आहे. Single Nodal Agency ने खात्यात जमा झालेले व्याज वेळोवेळी केंद्र शासनास परत करावयाचे आहे.

४. उपरोक्त योजनेंतर्गत बिनव्याजी कर्ज उपलब्ध होणार असून, त्या अंतर्गत करावयाच्या कामांवरील खर्चासाठी वित्त विभागामार्फत खर्चाचे स्वतंत्र लेखाशीर्ष घेवून, अर्थसंकल्पीय तरतूद करुन केंद्र शासनाच्या दि.२३.०३.२०२१ च्या पत्रान्वये केंद्र पुरस्कृत योजनांच्या निधी वाटपासंदर्भात विहीत केलेल्या नवीन कार्यप्रणालीचे व वित्त विभागाच्या संदर्भीय क्र.४ येथील दि.१.७.२०२१ अन्वये निश्चित केलेल्या कार्यप्रणालीचे पालन करणे आवश्यक आहे. केंद्र शासनाच्या Special Assistance to States for Capital Investment (SASCI) या योजनेंतर्गत प्राप्त होणारा निधी वित्त विभागाने अर्थसंकल्पीत करुन तो कार्यान्वयीन यंत्रणांना वितरित करावा लागणार आहे.

केंद्र शासनाकडून राज्यांना "भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य (SASCI)" योजनेसाठी SNA चे स्वतंत्र खाते व अंतर्गत बजावणी यंत्रणांसाठी शुन्य शिल्लक खाते उघडण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्याप्रमाणे शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे :-

**शासन निर्णय :-**

१. प्र PFMSणालीच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासन व अंमलबजावणी यंत्रणा यांमध्ये समन्वय व संनियंत्रणासाठी " राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य " या केंद्र पुरस्कृत योजनेतील सर्व भागांसाठी सह सचिव/उप सचिव (अर्थबळ) यांना Single Nodal Agency (SNA) तसेच अवर सचिव (अर्थबळ) यांना State Scheme Manager (SSM) म्हणून घोषित करण्यात येत आहे.

२. सदर योजनेंतर्गत सर्व भागांसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या निधीसाठी Single Nodal Agency (SNA) चे स्वतंत्र बँक खाते )Single Nodal Bank Account) व अंमलबजावणी यंत्रणांना शून्य शिल्लक उपखाती (Zero Balance Subsidiary account) बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय शाखा या बँकेत उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर खात्यांचा वापर केवळ उक्त योजनेच्या प्रयोजनासाठीच करावा.

४. सदर SNA खाते व शुन्य शिल्ल्क उपखाती (Zero Balance Subsidiary account) हे PFMS प्रणालीशी संलग्नीत करावे.

५. सदर योजनेचा निधी केंद्रीय पध्दतीने संबंधित यंत्रणांना वितरीत करण्याकरीता कोषागारातून प्रत्येक योजनेसाठी प्राप्त होणारा निधी प्रथमत: संबंधित योजनेच्या PFMS प्रणालीशी संलग्नीत SNA च्या बँक खात्यात जमा करावा आणि तद्नंतर संबंधित यंत्रणांनी त्यांच्या स्तरावरुन निवडलेल्या प्रकल्पांवर केंद्रिय पध्दतीने खर्च करावा.

६. संबंधित यंत्रणांनी सदर खात्यातील व्यवहारांचे मासिक / तिमाही ताळमेळ तसेच लेखापरिक्षण करावे.

७. सदर SNA खाते भविष्यात बंद करण्यात आल्यास, त्यामधील शिल्लक रकमेचा ताळमेळ घेऊन शिल्लक अखर्चीत रक्कम योग्य त्या शासन लेखाशीर्षाखाली तात्काळ जमा करावी.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१४१५०४५५९१०५ असा आहे. सदरहू शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

POOJA JITENDRA TARADE

Digitally signed by POOJA JITENDRA TARADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=c1ad735f201fb023462e727071fd07ea7587bbffc483dcf02899ed17417c2cd3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8FEF5BBFF63D0C5A82076ECCC89BF9E2D79F414C4135BD1337AFE7F80637F82F, cn=POOJA JITENDRA TARADE
Date: 2026.05.14 15:06:43 +05'30'

**( पूजा जि. तरडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य,यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, मुंबई / नागपुर
८. महालेखापाल, (लेखापरिक्षा)-१/२, मुंबई/ नागपुर
९. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. सह सचिव/उप सचिव, अर्थसंकल्प/रोखशाखा/सर्व व्यय कार्यासने/लेखा व कोषागरे, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. निवड नस्ती (अर्थबळ)